वाचले:- १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. पीसीसी/३००५/३००७/प्रक्र-२१५/२००५/नवि-२२ दि.१३/१०/२०१०.

२) मां.आयुक्त यांचेकडील दि.११/०९/२०१८ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८, लेखा विभाग
क्र. लेखा/९७/कावि/११२८/२०१८
दिनांक - ११/०९/२०१८

**विषय: - निविदा प्रक्रियेमध्ये अभिप्राय देण्याचे कार्यपध्दतीबाबत**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकारची कामे तसेच वस्तू व सेवा यांच्या खरेदीसाठी निविदा / कोटेशन / दरपत्रके इ. प्रक्रिया राबविण्यात येते. मागील अनेक वर्षापासून अशा निविदा / कोटेशन प्रस्तावांवर लेखापरिक्षण विभागाचे अभिप्राय घेण्यात येत होते. मात्र उपरोक्त शासन निर्णय क्र. पीसीसी/३००५/३००७/प्रक्र-२१५/२००५/नवि-२२ दि.१३/१०/२०१० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता उपमुख्यलेखापाल / अंतर्गत लेखापरिक्षक या अभिनामाचे पद -वर्ग १ मध्ये मुख्यलेखापरिक्षक पदाचे समकक्ष र.रु. १०६५०-३२५-१५८५०/- (सहाव्या वेतन आयोगानुसार १५,६००-३८,१०० ग्रेड पे ६,६००/-) या वेतनश्रेणीमध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या निहित करण्यात आलेल्या आहेत.

यास्तव मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८. प्रस्तुतचे आदेशान्वये निविदा नस्तींवर अभिप्राय देण्याचे कामकाज श्री.विजय मारुती इंगुळकर, प्र.अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडे सोपविण्यास तसेच याकामी अंतर्गत लेखापरिक्षण हा स्वतंत्र विभाग निर्माण करण्यास मान्यता देत आहे. याकामी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१. र.रु. १ कोटी पर्यंत रकमेच्या निविदा नस्तींची पडताळणी व अभिप्राय देण्याचे कामकाज हे उपमुख्यलेखापाल तथा अंतर्गत लेखापरिक्षक यांचेमार्फत करण्यात येईल.
२. र.रु. १ कोटी ते २५ कोटी पर्यंत रकमेच्या निविदा नस्तींची पडताळणी व अभिप्राय देण्याचे कामकाज हे मुख्यलेखापाल यांचेमार्फत करण्यात येईल.
३. र.रु. २५ कोटीच्या वरील सर्व निविदा नस्तींची पडताळणी व अभिप्राय देण्याचे कामकाज हे मुख्यलेखापरिक्षक यांचेमार्फत करण्यात येईल.
४. श्री.विजय इंगुळकर हे अंतर्गत लेखापरिक्षण विभागाचे विभागप्रमुख म्हणून आयुक्तांचे नियंत्रणाखाली कामकाज पाहतील.
५. उपरोक्त वाचले क्र. १ चे शासन निर्णयातील नमूद केलेली सर्व कामे श्री.इंगुळकर पार पाडतील.
६. निविदा अभिप्रायाचे कामासाठी प्रशासन विभागामार्फत अनुभवी २ लेखापाल / उपलेखापाल, २ लिपीक व २ शिपाई कर्मचारी अंतर्गत लेखापरिक्षण कार्यालयास तसेच लेखा विभागाकरिता २ लेखापाल / उपलेखापाल कर्मचारी त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावेत.
७. शहर अभियंता यांनी अंतर्गत लेखापरिक्षण कार्यालय सुरु करणेकामी महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये तातडीने जागा तसेच आवश्यक फर्निचर उपलब्ध करुन द्यावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

Scanned by CamScanner